जा.क्र.उमाशि-१/११ वी ऑनलाईन/पुवि/२०१५
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : १८/८/२०१५ 21 AUG 2015

प्रति,

मा.प्राचार्य,
स.प.महाविद्यालय,
पुणे.

**विषय :-** इयत्ता ११ वी ऑनलाईन ६ व्या फेरीसाठी आपल्या कॉलेजमधील सभागृह प्रवेशाचे केंद्र म्हणून उपलब्ध करुन देणेबाबत.

**संदर्भः-** दि.२२/८/२०१५ रोजी मा.अध्यक्ष व प्राचार्य, स.प.महाविद्यालय, पुणे यांच्याशी झालेली चर्चा

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सन २०१५-१६ साठी सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे इ. ११ वी वर्गातील प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीमार्फत ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले आहेत. या प्रवेश प्रक्रियेतील सहाव्या फेरीसाठी ऑनलाईन समुपदेशन तक्रार निवारण फेरीचे नियोजन करण्यात आलेले आहे.

आपल्याशी झालेल्या चर्चेनुसार सोमवार दि.२४/०८/२०१५ ते बुधवार दि.२६/०८/२०१५ पर्यंत सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत आपल्या अधिनस्त लेडी रमाबाई सभागृह, संत ज्ञानेश्वर सभागृह, व टिळक शिक्षण महाविद्यालयाचे सभागृह प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध करुन द्यावे. सदर ठिकाणी ४ कॉम्प्युटर, १ प्रिंटर, १ प्राजेक्टर, १ मोठा स्क्रिन व इंटरनेटची सुविधा असा संच प्रत्येक सभागृहात अद्ययावत उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच हॉल मध्ये पालक व विद्यार्थी यांचेसाठी बैठक व्यवस्था व पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. इ.११ वी ची ६ वी ऑनलाईन समुपदेशन तक्रार निवारण प्रवेश फेरी यशस्वी करण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १